वर्ष : ०४, अंक : २५७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध




बुलडाणा, मंगळवार, दि.२९ एप्रिल २०२५




# विकासाच्या 'इकोसिस्टीम'मुळे महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२८, मुंबई :**
राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. त्यामध्ये रस्ते, रेल्वे, बुलेट ट्रेन, जलमार्ग आदींसह बंदर आणि विमानतळ विकासाच्या कामांचा सम ावेश आहे. या संपूर्ण विकासाच्या ' इकोसिस्टीम'मुळे राज्यात मोठ्या प्रम ाणावर गुंतवणूक होत आहे. महाराष्ट्र विकासाच्या बाबतीत देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

हॉटेल फोर सीजन येथे इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडर समिट - २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत सीएनबीसी टीव्ही १८ वृत्तवाहिनीच्या संपादक शिरीन भान यांनी घेतली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम गतीने सुरू आहे. या ट्रेनने २०२८ पर्यंत प्रवास करणे शक्य होणार आहे. वाढवण बंदराजवळ बुलेट ट्रेनचे स्थानक निर्माण करण्यात येणार आहे. मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. सागरी किनारा रस्ता, अटल सेतू, विविध मेट्रो मार्गांची कामे ही त्यातली ठळक उदाहरणे आहेत. या सर्व विकास कामांमुळे मुंबईत गुंतवणूक ५० बिलियन डॉलरपर्यंत जाणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प गेम चेंजर ठरणारे




आहेत. यासोबतच पुणे येथील नवीन विमानतळ, शिर्डी, नागपूर विम ानतळाचा विकास, नदी जोड प्रकल्प, बुलेट ट्रेन प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

सागरी किनारा रस्ता विरारपर्यंत वाढविण्यात येत आहे. वाढवण बंदर हे सध्या अस्तित्वात असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्टपेक्षा तीन पट मोठे आहे. या बंदराला प्रवेश नियंत्रित असलेल्या महामार्गाने नाशिकपर्यंत जोडण्यात येऊन पुढे समृद्धी महाम ार्गाला जोडण्यात येईल. वाढवण बंदराजवळ नवीन आंतरराष्ट्रीय विम ानतळ निर्माण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच या परिसरात चौथ्या मुंबईचेही निर्माण करण्यात येणार आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात पुरामुळे वाहून जाणारे पाणी तसेच पश्चिम घाटातून समुद्रात वाहून जाणारे पाणी उजनी धरण व मराठवाड्यात वळविण्यात येणार आहे. यावर राज्य शासन काम करीत आहे. त्यामुळे भविष्यात म राठवाडा निश्चितच दुष्काळमुक्त होणार आहे. 'समृद्धी महामार्ग' नंतर राज्यात नागपूर ते गोवा 'शक्तिपीठ महामार्ग' निर्माण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र हे नेहमी भविष्यासाठी 'रेडी' असणारे राज्य आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात गुंतवणूकदारांना सोयी सुविधा मिळण्यासाठी व गतीने गुंतवणूक येण्यासाठी 'इज ऑफ डुईंग बिजनेस' मध्ये राज्य मोठी झेप घेत आहे. २०२९ मध्ये महाराष्ट्र 'इज ऑफ डुईंग बिजनेस' मध्ये पहिला असेल. गुंतवणूकदारांच्या सुविधेसाठी मैत्री पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून ' सिंगल विंडो सिस्टीम ' कार्यान्वित करण्यात आली आहे. गुंतवणूकदारांना सिंगल विंडो सिस्टीममुळे उद्योग स्थापन करण्यास सुलभता येत आहे.

दळणवळणाच्या सोयी सुविधांचा होणाऱ्या विकासामुळे राज्यात मालवाहतूक गतीने करण्यात येत आहे. नागपूरपर्यंत आठ तासांम ध्ये जवाहरलाल नेहरू बंदरापासून जाता येते. वाढवण बंदरामुळे यामध्ये आणखी गतिमानता येणार आहे. नागपूर येथे कार्गो हब विकसित करण्यात आले आहे. यासोबतच पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरही कार्गो हब विकसित करण्यात येत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी विकासाचा आलेख मांडला.

'नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विम ानतळ' तसेच 'अटल सेतू' यामुळे तिसरी मुंबई निर्माण होणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री म्हणाले, या भागात नवीन एज्युसिटी निर्माण करण्यात येत आहे. जगभरातील विविध नामांकित विद्यापीठे या परिसरात शैक्षणिक दालन उघडणार आहेत. त्यासोबतच हेल्थ सिटी, इनोवेशनन सिटीचे निर्माणही करण्यात येत आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा निर्मिती करण्यात येत आहे कृषी क्षेत्राचे १६००० मेगावॅटची वीज पूर्णपणे सौर उर्जेवर निर्माण करण्यात येणार आहे. सध्या या क्षेत्रात २१ टक्के राज्याची क्षमता असून २०३० पर्यंत ती ५२ टक्क्यांपर्यंत नेण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेद्वारे ३००० रोहित्र सौर ऊर्जेवर आणण्यात आल्या आहे. सार्वजनिक वाहतूक आणि परिवहन सेवेमध्ये आमूलाग्र बदल करण्यात येत आहे. इलेक्ट्रिक वाहनांची मोठी मागणी राज्यात आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतही इलेक्ट्रिक वाहनांचा सम ावेश करण्यात येत आहे. इलेक्ट्रिक वाहनांमध्ये महाराष्ट्र हे देशाची राजधानी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## थोडक्यात

### पहलगाम हल्लूयात मृत्यमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटूंबाची उपमुख्यमंत्री शिंदे यांनी घेतली भेट



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**
**दि.२८, डोंबिवली :** जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्लूयात मृत्युमुखी पडलेल्या हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने, यांच्या कुटुंबीयांची आज महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी सांत्वनपर भेट घेतली.

यावेळी त्यांच्याकडून घडलेला प्रसंग जाणून घेत त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे अश्वासन दिले. या हल्लूयात मृत्यमुखी पडलेल्यांच्या कुटूंबाना सरकार वाऱ्यावर सोडणार नाही, असे सांगताना या पीडित कुटूंबातील मुलांचे शिक्षण त्यांची नोकरी यासाठी देखील शासन सर्वतोपरी मदत करेल असे सांगून त्यांना याबाबत आशवस्त केले. यावेळी त्यांना धीर देताना या घटनेतील दोषींवर केंद्र सरकार कठोरात कठोर कारवाई करून तुम्हाला नक्की न्याय मिळवून देईल असेही सांगितले.

यावेळी कल्याण-डोंबिवलीचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार डॉ. बालाजी किणीकर, आमदार राजेश मोरे,कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, माजी नगरसेवक महेश पाटील आणि शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### किरकोळ वादातून तरुणाची चाकूने भोसकून हत्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२८, : नागपूर :** शहरातील गुन्हेगारी घटनांना आळा घालण्याचे प्रयत्न सुरु असतानाच नागपूरच्या जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी ओव्हरटेकिंगच्या किरकोळ वादातून एका तरुणाचा जीव गेला. २५ वर्षीय वंश उर्फ अतुल डहारे याची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपी नीलेश सहारे आणि त्याच्या अल्पवयीन साथीदाराला अटक केली आहे.

चाकूने सपासप वार...

मिळालेल्या माहितीनुसार, वंश उर्फ अतुल डहारे वाडी परिसरात राहत होता आणि ट्रक चालक म्हणून काम करत होता. रविवारी वंश त्याचा सहकारी उत्कर्ष विरखेडे याच्यासोबत कामठी रोडवरून ट्रकचे वजन करून परत येत होता. दरम्यान, मध्य प्रदेशातील बालाघाट येथील रहिवासी आरोपी नीलेश सहारे आपल्या ट्रकसह त्यांना ओव्हरटेक करून पुढे गेला. यावरून वंश नाराज झाला आणि जरीपटका परिसरातील तथागत चौकाजवळ सिग्नलवर थांबले असता, वंशने नीलेशच्या ट्रकच्या चाव्या काढून घेतल्या. चाव्या काढल्यामुळे संतापलेल्या नीलेशने ट्रकमध्ये ठेवलेला धारदार चाकू काढून वंशवर सपासप वार केले. वंशचा सहकारी उत्कर्ष विरखेडे वाद मिटवण्यासाठी पुढे आला असता, त्याच्यावरही नीलेशने हल्ला चढवला. या हल्लूयात उत्कर्ष जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी वंशला तातडीने रुग्णालयात हलवले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेनंतर जरीपटका पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि काही तासांतच आरोपी नीलेश सहारे आणि त्याच्या अल्पवयीन साथीदाराला अटक केली. पोलिसांनी दोघांवरही हत्या आणि हत्येच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल केले आहेत.

# मुंबईत स्वत:च्या हक्काच्या घराचे स्वप्न होणार साकार

**अक्षराज : संजय पंडित**
**दि, २८, मुंबई :** मुंबईत स्वत:चं हक्काचं घर असावं, असं प्रत्येकालाच वाटत असतं, पण शहरातील घरांच्या वाढत्या किंमती पाहता ते आता आटोक्याबाहेर गेले आहे. यामुळेच अनेकजण मुंबईबाहेर घरासाठी प्रयत्न करतात. अशावेळी म्हाडाच्या लॉटरीचा दिलासा घर घेणाऱ्यांसाठी असतो. या लॉटरीतून इच्छुकांना परवडणाऱ्या किंमतीत घर उपलब्ध होत असते.

लवकरच मुंबईत म्हाडाच्या घरांची लॉटरी निघणार आहे. यामुळे मुंबईत हक्काचे घर घेण्याचे तुमचे स्वप्न पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे ही लॉटरी दिवाळीपूर्वीच लागणार आहे. म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत यासंदर्भात माहिती दिली आहे. मुंबईत सुमारे ५ हजार घरांची लॉटरी काढली जाणार आहे. सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात लॉटरी काढली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

लवकरच सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किंमतीत म्हाडाची घरे उपलब्ध होणार आहेत. म्हाडाच्या घरांच्या किमती निश्चित करण्याबाबतच्या सूत्राची पुनर्रचना करण्यासाठी प्राधिकरणाने त्रिसदस्यीय समिती नेमली आहे. म्हाडाने नेमलेली समिती सर्वसामान्यांना स्वस्तात घर मिळेल आणि म्हाडाचेदेखील नुकसान होणार नाही यादृष्टीने अभ्यास करणार आहे. पुढील तीन महिन्यांत ही समिती आपला अहवाल उपाध्यक्षांकडे सादर करणार असून त्यानंतर तो मंजुरीसाठी शासनाकडे पाठवला जाणार आहे.

सध्या जमिनीचा खर्च, बांधकाम खर्च आणि आस्थापन खर्च आदींचा विचार करून म्हाडाच्या घराच्या किमती निश्चित केल्या जातात.

अत्यल्प आणि अल्प गटातून म्हाडा शून्य टक्के नफा घेते. मध्यम उत्पन्न गटातून दहा टक्के तर उच्च उत्पन्न गटातून १५ टक्क्यांपर्यंत नफा घेऊ शकते. म्हाडाने एखादा भूखंड दहा-बारा वर्षांपूर्वी घेतला असेल तर त्या भूखंडाच्या सुरक्षेसाठी मोठा खर्च केला असेल तर त्या खर्चाचादेखील घराच्या किमतीत समावेश केला जातो. त्यामुळे साहजिकच घरांच्या किमती वाढतात. एखाद्या भूखंडावर उशिरा इमारत बांधली गेली असेल तर त्याचा भुर्दंड सर्वसामान्यांनी का सहन करायचा? प्राधिकरणाचे नुकसान न होता सर्वसामान्यांना स्वस्तात घर मिळाले पाहिजे यादृष्टीने घरांच्या किमती ठरवताना कोणत्या गोष्टी अंतर्भूत करायच्या आणि कोणत्या नाही याचा समिती अभ्यास करणार आहे, अशी माहिती म्हाडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

दरम्यान म्हाडाच्या धोरणानुसार ३०० चौरस फ ुटापर्यंतची घरे अत्यल्प उत्पन्न गटासाठी,४५० चौरस फ ुटापर्यंतची घरे अल्प उत्पन्न गटासाठी,६०० चौरस फ ुटापर्यंतची घरे मध्यम उत्पन्न गटासाठी तर ९०० चौरस फुटापर्यंतची घरे उच्च उत्पन्न गटासाठी देण्यात येतात. उपनगरातील ३०० चौरस फुटाच्या घराची किंमत आणि तेवढ्याच क्षेत्रफळाच्या दक्षिण मुंबईतील घराची किंमत यात जमीन-अस्मानाचा फरक असतो. त्यामुळे घराच्या क्षेत्रफळाऐवजी त्याच्या किमतीनुसार उत्पन्न गट ठरवता येतील का, याचाही अभ्यास केला जाणार असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

# मराठवाड्यात असणार उष्ण आणि दमट वातावरण, विदर्भात पावसाचा इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२८, पुणे :** मागील काही दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होताना दिसतोय. कधी पाऊस ते कधी ऊन अशी स्थिती राज्यात आहे. उष्णता वाढण्याचे संकेत असतानाच आता परत एकदा राज्यावर अवकाळी पावसाचे ढग दिसत आहेत. होळीनंतर राज्यामध्ये उष्णता वाढणार असल्याचे सांगितले जात होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला आणि मोठा फटका पिकांना बसला. हेच नाही तर नाशिकमध्ये जोरदार गारपिट झाली आणि द्राक्ष बागांचे मोठे नुकसान झाले. एप्रिल महिन्याच्या सुरूवातीला अनेक ठिकाणी पाऊस झाला.

**विदर्भावर अवकाळीचे संकट**

मागील दोन ते तीन दिवस राज्यामध्ये पारा वाढताना दिसला. मात्र, आता परत पावसाचा इशारा काही भागांमध्ये देण्यात आलाय. दुसरीकडे काही शहरांमध्ये पारा ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जाताना देखील दिसतोय. मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात अवकाळीचा फटका बसला आहे. राज्यामध्ये अजूनही पावसाला पोषक वातावरण असल्याचे बघायला मि ळतंय. आता हवामान खात्याकडून मोठा इशारा देण्यात आलाय.

**मराठवाडा आणि विदर्भाला इशारा**

विदर्भात तापमान वाढताना दिसतंय. विदर्भातील काही शहरांमध्ये राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद देखील करण्यात आलीये. आता विदर्भातील काही भागांमध्ये अवकाळी पाऊस होण्याची शक्यता पुढील चार दिवस वर्तवण्यात आलीये. फक्त विदर्भच नाही तर मराठवाड्यात देखील. कोकण आणि मुंबईमध्ये वातावरण सामान्य राहिला. इतर अनेक शहरांमध्ये ढगाळ वातावरण राहण्याची देखील शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर, बीड, अकोला, नांदेड, चंद्रपूर, सांगली, सातारा, जळगाव, सोलापूर या भागांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली.

*** Name Change ***

I, Niteenchandra Khanderao Mandale (Old, Present Name) Address - Mahsul Colony, Kalamb, Behind Tehsil Office, Kalamb, District Osmanabad 413507, permanently changing **Nitinchandra Khanderao Mandale** (New Name) from Niteenchandra Khanderao Mandale for Government and other work.

# संपादकीय



## मोबाईलपेक्षा मुलं महत्त्वाची!

मैदानावरून धावत होतो. योग कट्ट्यावर पती-पत्नी आणि त्यांचे छोटेसे मूल, साधारणतः दोन ते तीन वर्षांचे, दोघांच्या मध्ये लुडबुडत होते. मुलाच्या आई-बाबांच्या हातात मोबाईल होते. दोघे मोबाईल पाहण्यात दंग होते. मूल दोघांच्या साद-प्रतिसादाची व्याकुळतेने वाट पाहत होते. मुलाला आईकडून प्रेम, मायेची उब हवी होती; तर वडिलांकडून शाबासकी, हिंमत आणि सुसंवाद हवा होता. पण त्या दोघांकडून काहीच मिळत नव्हते. दोघे मोबाईललाच आपला सखा-सोबती मानून त्यालाच साथ देत होते. बिचारा मुलगा अश्रूंनी डोळे भरून रडू लागला, तरी जन्मदात्या आई-बाबांना त्याच्यासाठी मायेचा पाझर फुटत नव्हता. ते एकमेकांकडे पाहत पुन्हा मोबाईलमध्ये गुंग झाले. शेवटी मुलाने मोठ्याने टाहो फोडला. आईने म ोबाईल एका हातात आणि मूल दुसऱ्या हातात धरून आपल्या मायेची मोबाईल आणि मुलामध्ये समान वाटणी केली.

आज माणसाचं पानही मोबाईलशिवाय हालत नाही. अशा काळात मुलांचे संगोपन करण्यात मोबाईल मोठा अडथळा ठरत आहे. मुलांशी सुसंवाद घडला नाही, तर वय वर्षे १ ते १४ पर्यंतच्या मुलांच्या तीव्र जिज्ञासांना पंख लावता येणार नाहीत. त्यांची सर्जनशीलता, नवनिर्मितीची आणि ज्ञान- माहिती मिळवण्याची ओढ कमी होईल. मुलांशी सुसंवाद घडला तरच त्यांना संस्कार देता येतील. मोबाईलवर प्रेम करणाऱ्या आई-बाबांकडे पाहून मुलांमध्ये नक्कीच न्यूनगंडाची भावना निर्माण होत असेल.

'मुलं ही पालकांचे अनुकरण करतात' या सूत्रानुसार पुढे ही मुलंही पालकांसारखी मोबाईलला चिकटतात.त्यांचा स्क्रीन टाइम वाढतो. ही मुलं शारीरिक, मानसिक आणि भावनिक दृष्ट्या अप्रगत राहू शकतात . मोबाईल की मुलं...? हा प्रश्न पालकांनी आता धाडसाने सोडवला पाहिजे. मोबाईल वापरण्याची स्वतः ची आचारसंहिता तयार केली पाहिजे. मुलांना मोबाईलचा पर्याय न देता कृतीला वाव देणारी खेळणी द्यायला हवीत. मुलांशी सतत संवाद साधायला हवा, त्यांच्या भावना समजून घ्यायला हव्यात. वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत मुलांचा पाच हजार शब्दांचा शब्दसंग्रह होणं अत्यावश्यक असतं. त्यामुळे श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या भाषा शिक्षणाच्या पाया मजबूत होतो. मोबाईलमुळे कमी ऐकवलं गेलं तर पुढील सर्व टप्पे ढासळू शकतात.

आजकालची लहान मुलं देखील म ोबाईलच्या आहारी गेली आहेत. मोबाईल पाहत पाहत जेवण्याची सवय त्यांना त्यांच्या आईकडून लागते. यातून मुलांना काय खातात आणि किती खातात हे समजत नाही. अन्नाबद्दल गोडी निर्माण होत नाही. मन लावून अन्न खाल्ल्यासच पोषक तत्त्वे मिळतात आणि बुद्धी तल्लख व शरीर सुदृढ होते. मोबाईलमुळे संवाद हरवला आहे. याची जाणीव सर्वांना होत आहे. पूर्वी आजी-आजोबा आपल्या नातवंडांशी संवाद साधायचे. गप्पा, गोष्टी घडायच्या. आज विभक्त कुटुंबपद्धतीमुळे ही पोकळी मोठी आहे. ती सुद्धा भरून काढण्याचे काम आई बाबांना करायचे आहे.

मुलांचं संगोपन घोड्यावर स्वार होण्यासारखं आहे. कधी गतीला अनुसरावं लागतं, कधी लगाम घट्ट करावा लागतो. मुलांशी संवाद साधण्याचं तंत्र पालकांनी शिकलं पाहिजे. मोबाईलमध्ये सतत तोंड खुपसून हे शक्य होणार नाही.

पालकत्व हे कोणत्याही शाळेत शिकवलं जात नाही. ते स्वतःच्या अनुभवातून आत्मसात करावं लागतं. मुलांमधील गुण ओळखून त्यांना संधी उपलब्ध करून देणं आवश्यक आहे.

खोटं न बोलणं, मदत करणं, सार्वजनिक जीवनात सहभागी होणं, हे मुलांना शिकवायचं असेल तर मोबाईल बाजूला ठेवावा लागेल. म ुलांमध्ये समाजावर विश्वास वाढवणाऱ्या गोष्टींवर भर द्यायला हवा.

शेवटी, मुलांसाठी मोबाईल स्विच ऑफ करून गुणवत्तापूर्ण वेळ द्यायलाच हवा!

# समकालात परशुराम !

परशुरामांचे या काळात स्मरण करणे आणि त्यांच्या ऐतिहासिक काळांमधील कुठले पैलू सामाजिक दृष्टीने आजच्या काळातही महत्त्वाचे वाटतात, त्यांची नोंद घेणे आज, त्यांच्या जयंतीदिनी उपयुक्त ठरणार आहे.

विष्णूंच्या दशावतारांमधील सहावा अवतार म्हणून भगवान परशूराम ओळखले जातात. सुदृढ देहयष्टी, पराक्रमी, तेजस्वी व वेदशास्त्रसंपन्न, असे भगवान परशुरामांचे व्यक्तिमत्त्व.

भगवान परशुराम हे जमदग्नी ऋषी व आई रेणुकामाता यांचे पुत्र. पुत्र व्हावा ऐसा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा, असे आदर्शवत चरित्र भगवान परशुरामांचे आहे. अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी शक्ती, युक्ती, बुद्धी या साऱ्यांची गरज समजून त्यांनी आपल्या ताकदीचा उपयोग हातात परशू नावाचे शस्त्र घेऊन दुष्ट प्रवृत्तींचा संहार केला.

भगवान परशुरामांची कर्मभूमी कोकण समजली जाते. त्यांचा जन्म कर्नाटकात मलप्रभा नदीच्या उगमस्थानाच्या काठावरील जमदग्नीच्या आश्रमात झाला. परशुरामांची प्राचीन मंदिरे गोवा, तिरुवअनंतपुरम, केरळ, त्र्यंबकेश्वर, चिपळून तसेच त्यांनी निर्माण केलेली कुंडसुद्धा ठिकाणी आढळतात. ब्रह्मपुत्रेची उपनदी लोहित नदी काठी परशुरामांचे कुंड आहे. वसई तालुक्यात तुंगार डोंगरावर परशुरामांचे कुंड आहे. केरळमध्ये गुरुवायूर येथेही परशुरामांचे स्थान आहे. सामाजिक प्रगती हे जीवनध्येय बनवून लोकांच्या पाठीशी उभे राहून भ्रष्टाचाराचा बीमोड करणे व एक सुसंस्कृत, प्रगत समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. स्थानिक लोकांना वेदाचे शिक्षण व किनारपट्टी अभेद्य राहण्यासाठी शस्त्रविद्येचे शिक्षण दिले.

भारतीय वाययामध्ये दशावतारांना महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. या दशावतारांमध्ये ज्यांना चिरंजिवित्व लाभलेले आहे. त्यांनी औपचारिक शिष्यपरंपरा दीर्घकाळासाठी निर्माण केली. भीष्म, द्रोणाचार्य अशा कर्तबगार व्यक्तीचे गुरूपद ज्यांनी भूषविले अशा भगवान परशुरामांचे स्मरण आजच्या दिवशी करणे हे लाभदाची ठरणार आहे.



समाजाच्या अधिकारपदावर असलेली व्यक्ती ज्यावेळी कर्तव्यमुक्त होते, समाजकल्याणाऐवजी स्वार्थान व आततार्ईपणाणे समाजाचे शोषण करायला लागते, तेव्हा त्यांना वठणीवर आणायचे व चांगली व्यवस्था निर्माण करण्याचे काम परशुराम ांनी केले आहे.

परशुरामांचे आजच्या काळात स्मरण करणे आणि त्यांच्या ऐतिहासिक काळांमधील कुठले पैलू सामाजिक दृष्टीने आपल्या आजच्या काळातही महत्त्वाचे वाटतात, त्यांची नोंद घेणे उपयुक्त ठरणार आहे. भ्रष्टाचारी, अन्यायाविरुद्ध ठामपणे झगडणारा वर्ग निर्माण करणे ही आजची गरज आहे. हा नवा वर्ग ईश्वर चिंतनातही रमलेला असेल, त्याला अध्यात्मिक अधिष्ठाण असेल. म्हणजे त्यांच्यात केवळ भौतिक वासना निर्माण होणार नाहीत अशी ही सांगड घालणे, जी परशुरामांच्या स्वतःच्या आयुष्यात होती.

केवळ ज्ञानाच्या आधारावर लोककल्याण करता येत नाही, तर त्याच्या पाठीशी शक्ती उभी करावी लागते, हे त्यांनी त्यांच्या काळात कृतीतून दाखवून दिले. हातातील परशूने दैत्यांना समर्थपणे पिटाळून लावणारे परशुराम आम्हाला बरेच काही शिकवून जातात, सदाचारसंपन्न, प्रसंगी उग्र व कठोर बनवून अन्यायी कृत्य करणाऱ्या व दुष्टांच्या हृदयात धडकी भरवणाऱ्या पराक्रमी महापुरूषास त्रिवार प्रणाम.

**- उमेश जोशी**
**पानगाव( रेणापूर)**

## बाळ..

**नवीपिढी नवविचार**
**हवी प्रत्येकां स्थिरता**
**उशीरा करती विवाह**
**आधी व्यवस्थापूर्तता**

**लग्ना नंतर मुक्त पणे**
**जाणे एकदुजा व्यथा**
**एकांत फक्त दोघांचा**
**उलघडता जुनी कथा**

**गुड न्यूज केंव्हा देता**
**असे प्रत्येकां आरुथा**
**विचारत राही नजरा**
**सवाल तोचं इतरथा**

**नको लौंगिकसमस्या**
**उगाचं संशयीत तथा**
**कूसीत येणार जडता**
**आजकाल नवीव्यथा**

**न घडे काही विपरीत**
**रे वय दोघांचे वाढता**
**मनात भिती वांझोटी**
**रे वांझपणाची दृढता**

**वर्ष भरा हले पाळणा**
**चालत आली ही प्रथा**
**खपतनाही उशीरजरा**
**रे सारे अचंबित पृथा**

**योग्य ते दोन्ही पिढीचे**
**भिन्नविभिन्न जरीरस्ता**
**सन्मान कर विचारांचा**
**लादू नका तो शिरस्ता**

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# महानगरपालिकेच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन संपन्न

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, पनवेल :** महापालिकेने उभारलेल्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राची व्यवस्था पाहिल्यावर छातीठोकपणे सांगू शकतो की, ही सर्व व्यवस्था एक नंबर आहे. या प्रशिक्षण केंद्रासाठी म हापालिकेने दिलीप वेंगसरकर यांची अगदी अचूक निवड केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली इथे गुणवत्ताधारक खेळाडू निश्चितच घडतील. तसेच पालिकेच्या प्रयत्नांमुळे या खेळाडूंना चांगल्या संधी नक्की मिळतील, असा विश्वास राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केला.



नवीन पनवेल येथील नवनिर्मित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे भव्य उद्घाटन रविवार दि.२७ एप्रिल २०२५ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी ते बोलत होते. या वेळी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार पद्मश्री दिलीप वेंगसरकर, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, रायगड क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, सिडकोचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, म ाजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे व मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले की, दिलीप वेंगसरकर सारख्या जाणकार क्रिकेटपटूंकडून प्रशिक्षण घेऊन या अकादमीतून उत्तम खेळाडू घडतील. त्यांची अशा प्रकारची अकादमी चालवण्याची हातोटी नक्कीच उदयोन्मुख खेळाडूसाठी उपयुक्त आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पद्मश्री दिलीप वेंगसरकर म्हणाले, पनवेल कार्यक्षेत्रात क्रिकेट खेळाडूंमध्ये मोठ्या प्रमाणात टॅलेंट दिसून येते. या क्रिकेट प्रशिक्षण केंद्रामुळे त्यांना मोठे व्यासपीठ मिळेल आणि इथले खेळाडू भविष्यात भारतीय क्रिकेट संघातून खेळताना दिसतील.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज असलेल्या या क्रिकेट प्रशिक्षण केंद्रामुळे पनवेल आणि परिसरातील नवोदित क्रिकेटपटूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. वेंगसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली या भागातील क्रिकेटपटूंना उत्कृष्ट दर्जाची कामगिरी करण्याची संधी मिळणार आहे.

# विद्यार्थ्यांनी चित्रांमधून दर्शविले वसुंधरा व पर्यावरण संरक्षण, संवर्धनाचे महत्त्व

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, नवी मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आल्याप्रमाणे २२ एप्रिल रोजीच्या जागतिक वसुंधरा दिनापासून १ मे रोजीच्या महाराष्ट्र दिनापर्यंत वसुंधरा व पर्यावरण संवर्धक विविध उपक्रम राबविले जात आहेत.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक लोकसहभागातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये देशाचे उद्याचे भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभागी करून



त्यांच्यामध्येही पर्यावरण विषयक जागृती व वसुंधरा संवर्धनाची गोडी वृद्धिंगत केली जात आहे.

या अनुषंगाने पालिका क्षेत्रातील शाळांमध्ये शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्न खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली पर्यावरण समस्या व उपाययोजना या विषयावर विद्यार्थ्यांच्या मनात असलेल्या संकल्पनांना चित्राच्या रूपात अविष्कृत करण्यासाठी चित्रोत्सव हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांनी या विषयानुरूप चित्रे काढून चित्रांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन हे आपलं राष्ट्रीय कर्तव्य आहे याची जाणीव जागृती केली. याम ध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने जलप्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण तसेच प्लास्टिकचा भस्मासूर, वृक्षतोड अशा पर्यावरण विषयक विविध विषयांवर चित्रे काढून वसुंधरा संरक्षण व संवर्धन याविषयी बहुमूल्य संदेश दिला.

# नवीन गोष्टींना जुळवून घ्या!

घरात नवीन सून आली. नव्या नवरीचे नऊ दिवस संपले. सासूला सुनेच्या अनेक गोष्टी खटकू लागल्या. तिचं नटणं, स्वयंपाक करण्याची पद्धत, बोलणं ` हे सर्व सासूला स्वीकारायला कठीण वाटत होते. सुनेच्या एकूणच वागण्यात मॉडर्नपणा होता. सासूला तिचं हाय फाय राहणं आवडेना. मग कुरबुरी सुरू झाल्या. बिचाऱ्या नवऱ्याची मात्र यात तारेवरची कसरत सुरू झाली.

रेल्वे धावत असताना अचानक सांधा बदलते आणि जोराचा खडखडाट होतो, त्याचप्रमाणे माणसं सुद्धा नवीन गोष्टींना सामोरी जाताना आदळाआपट करतात. संगणकाचा प्रवेश झाल्यानंतर ९० च्या दशकात अनेकांनी त्याविरुद्ध आपला राग व्यक्त केला होता. लोक म्हणायचे, बेरोजगारी वाढेल, संगणक चालवणं सर्वसामान्यांना अवघड आहे, निरक्षरता जास्त आहे, अशा अनेक सबबी सांगून संगणकाला विरोध झाला.परंतु काळाच्या ओघात संगणक सर्व कार्यालयांत पोहोचला आणि घराघरात देखील स्थिरावला. लोकांची कामे सोपी झाली, वेळ वाचू लागला, आणि कामाची गुणवत्ता वाढली. कोणत्याही सुधारणेला, तंत्रज्ञानाला, नवीन कल्पना, व्यक्ती आणि बदलाला सुरुवातीला जोरदार विरोध होतोच. हा विरोध मुख्यतः अज्ञान किंवा अनभिज्ञतेमुळे होतो. आज नव्याने आलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सबाबतही असेच चित्र दिसते आहे. अनेक लोकांना या तंत्रज्ञानाची खरी माहिती नाही. त्यामुळे ते भीतीतून किंवा गैरसमजातून अख चा निषेध करतात. काही लोक म्हणतात, अख मुळे माणूस गुलाम बनेल, मानवी संस्कृतीचा ऱ्हास होईल, किंवा नैतिकता उरणार नाही. हेच संगणकाच्या काळातही ऐकायला मिळाले होते.

नवीन गोष्टी स्वीकारण्यास माणसं सहज तयार होत नाहीत. सासूचा सुनेला विरोध देखील काही वेळा याच भीतीतून होतो. सून डोईजड होईल, आपल्याला घरातून बाहेर काढेल अशी मनात अनाठायी भीती निर्माण होते. त्यामुळे सुनेला टोमणे मारणे, कुरकुर करणे सुरू होते.

पुढील टप्पा असतो अस्वीकाराचा. ही गोष्ट आपल्या देशात चालणार नाही, हे आपल्याला झेपणार नाही, अशी ओरड नवीन गोष्टींविषयी केली जाते. डिजिटल पेमेंटचा अनुभव घ्या. आज भारत डिजिटल व्यवहारांमध्ये जगात आघाडीवर आहे. पण सुरुवातीला डिजिटल पेमेंट करताना लोक घाबरत होते. पैसे बुडतील, हॅकिंग होईल, अशा शंका होत्या.

**बदल हा निसर्गाचा नियम आहे!**

पायी चालणाऱ्यांनी सायकल स्वीकारली. सायकलवरून दुचाकीवर आणि चारचाकीवर स्वार होण्याचा प्रवास झाला. विमानप्रवासामुळे संपूर्ण जग जवळ आले. विचारांचे आदानप्रदान झाले. नव्या संकल्पना, उत्पादने आणि सुधारित गुणवत्ता यांचा संगम झाला. माणसाला जर पुढे जायचं असेल, तर त्याने नवीन, चांगल्या आणि उपयोगी गोष्टींशी जुळवून घेतलेच पाहिजे. मात्र, जर बदल मानवी जीवनासाठी घातक असेल, तर त्याला कडाडून विरोध करायलाच हवा. मुठभर लोकांचे कल्याण करणाऱ्या, पण बहुसंख्यांना त्रासदायक ठरणाऱ्या बदलांना निःसंकोच विरोध व्हायला हवा.

जेव्हा शासन नवीन कायद्यांचे मसुदे तयार करते, तेव्हा जनतेकडून सूचना मागवल्या जातात. अशावेळी प्रत्येकाने सजग राहून विरोध किंवा सहमती व्यक्त केली पाहिजे. केवळ भावनांच्या भरात नाही, तर शहाणपणाने, विचारपूर्वक निर्णय घेतला पाहिजे.

पूर्ण चिकित्सा करूनच नवीन गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत.

अंध विरोध न करता, बदलांचे फायदे-तोटे सम जून घेतले पाहिजेत.

कारण शेवटी, नवीन गोष्टी स्वीकारणं म्हणजे स्वतःचा विकास घडवणं!

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## वंडगीरच्या तरुणाने केले आई वडीलांचे स्वप्न साकार



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२८, नांदेड (मुखेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथून जवळच असलेल्या वंडगीर या छोट्याशा गावातील अभिषेक आनंदराव देवकत्ते (पाटील) हा वंडगीर गावचा पहिला एमबीबीएस डॉक्टर बनला. कष्टाच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले. त्याचे वडील शेतकरी व आई गृहणी आहे. त्याच्या या यशामागे त्याचे आई-वडील व मामा, मामी तसेच त्याचे संपूर्ण कुटुंब यांचे ही त्याला सहकार्य लाभलेले आहे . अभिषेक चे शिक्षण पहिली ते सातवी छत्रपती संभाजी विद्यालय मुक्रमाबाद व आठवी ते दहावी विद्यावर्धिनी हायस्कूल उदगीर या ठिकाणी झाले आहे. अकरावी व बारावी दयानंद कॉलेज लातूर येथे झाले आहे. कोविड या महामारीच्या काळात सुद्धा सर्व क्लासेस बंद असताना घरीच अभ्यास करून त्यांने जिद्दीने व मेहनतीने कष्ट करून एम.बि.बि.एस.ची तयारी चालू ठेवली. व त्याला शासकीय मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल संभाजीनगर येथे त्याचे वैद्यकिय शैक्षणिक वर्षाला निवड झाली व त्याला त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले. त्याने शिक्षण पूर्ण करून एम.बी.बी.एस.ही पदवी मिळवली. त्याच्या या घवघवीत यशाबद्दल गावाकऱ्यांनी येथोचित्त सत्कार केला तसेच त्याची बहीण स्नेहा, भाऊ ओमकार व भाऊजी शेखर यांनी ही अभिषेक चे भरभरून कौतुक केले, तर कुटुंबीयांनी व समस्त गावकऱ्यांनी भरभरून शुभेच्छा दिल्या. त्याच्या या यशाबद्दल त्याचे परिसरातुन सर्वत्र कौतुक होत आहे.

## सेवा हक्क दिनानिमित्ताने माहिती फलकाचे अनावरण




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, पनवेल :** महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या वतीने दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आज मुख्यालयात सेवा हक्क दिनाची माहिती देणाऱ्या फलकाचे अनावरण आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते करण्यात आले तसेच यावेळी लोकसेवा सेवा हक्क बाबतची शपथ घेण्यात आली.

यावेळी महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, मंगला माळवे, स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, सहाय्यक नगररचनाकार केशव शिंदे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक अधिकारी डॉ.रूपाली माने, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी, मुख्य अग्निशामन अधिकारी प्रवीण बोडखे, उपअभियंता विलास चव्हाण, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य विभाग प्रमुख दशरथ भंडारी, महापालिकेचे सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आयुक्त चितळे म्हणाले, महापालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना ताबडतोब सेवा द्याव्यात. महापालिकेच्यावतीने 'पनवेल कनेक्ट ॲप' लाँच करण्यात आले असून या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना सुमारे ६२ सेवा दिल्या जात आहेत. महापालिकेच्या विविध सेवांच्या माध्यमातून कारभार अधिकाधिक लोकाभिमुख, उत्तरदायी, पारदर्शक करण्याच्या दृष्टीने भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## पर्यटकांच्या सुरक्षेसाठी 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल' : पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

**दि.२८, मुंबई :** पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी राज्य शासनाने 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल (पर्यटन मित्र)' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यटन क्षेत्रातील वाढत्या संधी, नैसर्गिक, सांस्कृतिक विविधतेचा विचार करता या सुरक्षा दलाच्या माध्यमातून पर्यटकांना सुरक्षित पर्यटनाचा अनुभव देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. पर्यटन मंत्री देसाई म्हणाले की, राज्यातील पर्यटन स्थळे, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा यांची माहिती पुरविणे हा या पर्यटन सुरक्षा दलाचा मुख्य उद्देश असणार आहे. १ ते ४ मे, २०२५ दरम्यान पार पडणाऱ्या सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर महोत्सवात 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल' प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात येणार आहे. राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, तसेच राज्यातील संस्कृती, इतिहास, पर्यटनस्थळे, कायदा, नियम, पर्यटनाविषयी आवश्यक माहिती देण्यासाठी राज्यात पर्यटन स्थळावर पर्यटकांच्या सेवेसाठी पर्यटन पोलिसांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सुरक्षा मंडळाने व मेस्कोने त्यांच्याकडे असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश पर्यटन विभागाने दिले आहेत. 'पर्यटन पोलीस' या संकल्पनेमुळे पर्यटन स्थळावरील शाश्वत पर्यटन पद्धती टिकवून ठेवण्यासाठी व शाश्वत पर्यटनच्या संवर्धनासाठी प्रयत्न करतील. पर्यटन मंत्री देसाई म्हणाले की, पर्यटन सुरक्षा दलाच्या नव्याने सुरूवातीमुळे राज्यातील पर्यटनाला नवसंजीवनी मिळेल. हे दल पर्यटकांच्या सुरक्षेसाठी तैनात असेल, ज्यामुळे देश-विदेशातील पर्यटकांचा विश्वास वाढेल. स्थानिक ठिकाणी रोजगाराच्या संधी निर्माण होतील. दलातील कर्मचारी विशेष प्रशिक्षण घेतील, जेणेकरून ते पर्यटकांना मार्गदर्शन आणि संरक्षण देऊ शकतील. पर्यटन स्थळांवर सीसीटीव्ही, हेल्पलाईन आणि तत्काळ प्रतिसाद यंत्रणा यासारख्या सुविधा उपलब्ध होतील.

**प्रायोगिक तत्त्वावर 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल'**

१ ते ४ मे २०२५ दरम्यान पार पडणाऱ्या महाबळेश्वर महोत्सवात 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल' प्रायोगिक तत्त्वावर कार्यान्वित होणार आहे. सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून २५ जवानांची नियुक्ती करण्यात येईल. या जवानांना पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि महोत्सवाच्या नियोजनानुसार आवश्यक प्रशिक्षण देण्यात येईल. हे दल २५ एप्रिल ते ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यरत राहील. या दलासाठी आवश्यक वाहन व्यवस्था आणि अन्य सुविधा पुरविल्या जातील. जवानांकडून योग्य कर्तव्ये पार पाडण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती सातारा जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून केली जाईल. या उपक्रमासाठी होणारा खर्च महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ आणि सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्याशी समन्वय साधून अदा केला जाईल. महाबळेश्वर महोत्सवातील प्रायोगिक तत्त्वावरील यशस्वी अंमलबजावणीनंतर, संपूर्ण महाराष्ट्रासाठी 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल' स्थापन केले जातील. या उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्रात रु. १ लाख कोटींची खासगी गुंतवणूक आणि १८ लाख प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## कामगार दिनापासून राज्यभर कामगार एकता जनजागृती मोहीम राबवणार : शरद पवळे

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२८, सुपा (अहिल्यानगर) :** १ मे कामगार दिनाचे औचित्य साधत राज्यातील कामगारांच्या प्रश्नावर राज्यभर जनजागृती मोहीम राबवून जनसंपर्क अभियान घेवून अर्थव्यवस्थेचा कणा असणारे कामगार अनेक संकटांना सामारे जात आहेत कामगारांचे प्रश्न हे केवळ त्यांचे व्यक्तीगत प्रश्न नाहीत, तर संपूर्ण राज्याच्या विकासाशी संबंधित आहेत. कामगार सुखी असेल तर अर्थव्यवस्थेचा कणा सुरक्षित राहील कामगार वर्ग हा कोणत्याही देशाच्या औद्योगिक व सामाजिक विकासाचा कणा आहे.

त्यांच्या श्रमाच्या जोरावर उद्योग, सेवा आणि शेती क्षेत्र भरभराटीस येते. परंतु दुर्दैवाने, आजही बहुसंख्य कामगार विविध प्रकारच्या समस्यांचा सामना करत आहेत. त्यांच्या अडचणी केवळ



आर्थिकच नाहीत, तर सामाजिक, मानसिक व आरोग्याशी संबंधित देखील आहेत ग्रामीण भागातील अनेक कामगार चांगल्या नोकरीच्या शोधात शहरांकडे स्थलांतर करतात. तेथे त्यांना वस्तीच्या, पाण्याच्या, स्वच्छतेच्या आणि शिक्षणाच्या सोयी अत्यंत अपुऱ्या मिळतात. त्यामुळे त्यांचे राहणीमान अत्यंत हालाखीचे असते.

मानसिक आरोग्य, दैनंदिन तणाव, अस्थिर नोकरी, कमी वेतन, आणि भविष्याची अनिश्चितता यामुळे कामगार वर्गात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे आत्महत्या, व्यसनाधीनता यांसारख्या गंभीर सामाजिक समस्याही उद्भवत आहेत

म्हणूनच कामगारांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहून उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. कामगार हा केवळ एक कर्मचारी नाही, तर विकासाच्या रथाचा सारथी आहे.

> कामगारांच्या श्रमावर देशाची उन्नती समृद्धी आणि भविष्य अवलंबुन आहे. त्याच संरक्षण व सन्मान करणे हे प्रत्येक राष्ट्राचे कर्तव्य आहे. या उद्देशाने कामगार दिनापासून राज्यभर कामगारांचे प्रश्न सोडवून न्याय देण्यासाठी कामगार एकता जनजागृती मोहीम राबवणार सुरू करून नवा आदर्श राज्यात उभा करण्याचा संकल्प याठीकाणी केला आहे.
>
> **- शरद पवळे**

कामगारांच्या उज्वल भविष्यासाठी सुरक्षिततेसाठी एकजुटीतुन कामगारांच भविष्य उज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी राज्यात नवे पर्व उभारून कामगारांच्या घामाला न्याय देण्यासाठी राष्ट्राच्या हितासाठी कामगारांचे संरक्षण करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांनी १ मे कामगार दिलापासून कामगार एकता कामगार संरक्षण राज्यव्यापी जनजागृती अभियान सुरू केले आहे. तरी या अभियानामध्ये सहभागी होण्यासाठी ८०५५५५१४०३ या क्रमांक संपर्क साधण्याचे शरद पवळे यांनी सांगितले असुन कामगाराचा सन्मान हाच ध्याय घेवून हे अभियान सुरू करत आहोत असे प्रसारमाध्यमांना बोलताना पवळे यांनी सांगितले.

## शिक्षण आणि प्रेमाच्या बळावर बौध्दिक दिव्यांग मुलांचे भविष्य उज्वल करा : आ.जोरगेवार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, चंद्रपूर :** आपल्या समाजातील प्रत्येक व्यक्तीला हक्काचे स्थान मिळाले पाहिजे. बौध्दिक दिव्यांग मुले ही आपल्या समाजाचा अविभाज्य घटक आहे. त्यांच्या आयुष्यात आनंद, आत्मसन्मान आणि स्वतंत्रतेची भावना निर्माण करणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने हातात हात घालून या कार्यात सहभागी होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. श्री साई मतिमंद शिक्षण संस्था, चंद्रपूर द्वारा संचालित स्विकार दुर्बल मनस्क (मतिमंद) मुलांची निवासी शाळा, ताडाळी येथे मार्गदर्शन शिबिर आणि बस लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला रेखाताई पिंपळशेंडे, ॲड. अजय पाचपोर, समाज कल्याण विभागाचे उपायुक्त राजेश पांडे, डॉ. दिलीप चौधरी, शाश्वत शेरे, नंदकुमार फुले, जैन, मुधोळकर, वैभव सनास्कर, नसगंटीवार, अमोल मारुतकर, आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, श्री साई मतिमंद शिक्षण संस्था ज्या प्रकारे या मुलांच्या विकासासाठी कार्यरत आहे, हे अत्यंत कौतुकास्पद आहे. केवळ शिक्षणच नव्हे, तर प्रेम, सहकार्य आणि योग्य दिशा या मुलांसाठी येथे दिली जात



आहे. आजच्या या कार्यक्रमात नव्या बस चे लोकार्पण करण्यात आले. ही बस या मुलांसाठी केवळ वाहतुकीचे साधन नसून, त्यांच्या स्वप्नांना गती देणारे साधन ठरेल. शिक्षणाचा आणि विकासाचा हा प्रवास अधिक सुलभ व सुरक्षित व्हावा, यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू. या मुलांसाठी केवळ भौतिक सुविधा पुरविणे पुरेसे नाही, तर त्यांना प्रेमाने, मानेने समजून घेऊन जगण्याची संधी देणे आवश्यक आहे. आम्हाही आवश्यक तेथे त्या सर्व मदतीसाठी कटिबध्द आहोत. ही मुले समाजाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांना वेगळे न मानता, त्यांच्या गरजांनुसार विशेष प्रेम, काळजी आणि संधी देणे, ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे असे आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## श्री संत सावता महाराज पतसंस्थेच्या चेअरमन पदी महेश क्षीरसागर तर व्हा. चेअरमनपदी प्रवीण मोहन क्षीरसागर यांची निवड



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२८, खंडाळा (सातारा) :** लोणंद येथील श्री संत सावता महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित लोणंद या संस्थेची २०२४-२५ ते २०२९-३० या कालावधी करिता निवडणूक प्रक्रिया नुकतीच संपन्न झाली. निवडणूक अधिकारी म्हणून राजश्री सुदन अध्यासी अधिकारी सहाय्यक निबंधक संस्था खंडाळा यांनी काम पहिले. हि निवडणूक प्रक्रिया बिनविरोध संपन्न झाली. काश्मीर पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या आतंकवादी हल्लूयांमध्ये मृत पावलेल्या नागरिकांना संस्थेच्या वतीने यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संस्थेचे सभासद व संचालक मंडळ यांनी संस्थेच्या चेअरमन पदी महेश अमृत क्षीरसागर यांची तर व्हॉइस चेअरमनपदी प्रवीण मोहन क्षीरसागर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनियुक्त चेअरमन व व्हाईसचेअरमन यांचा सत्कार समारंभ यावेळी संपन्न झाला.

यावेळी प्राध्यापक रघुनाथ शेळके, दत्तात्रय शेळके चेअरमन ग्राम पंचायत कर्मचारी पतसंस्था, सामाजिक कार्यकर्ते अनिल कुदळे, पत्रकार पांडुरंग कुंभार, युवा नेते अक्षय रासकर (कुर्णे) आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी संस्थेचे सभासद सोमनाथ स्वामी, वैभव क्षीरसागर, शेखर क्षीरसागर, विशाल काळे, स्वप्निल जमदाडे, शुभम नेवसे, संतोष पंडित, सुरेश शेलार, दयानंद क्षीरसागर, रणजीत शिरसागर, यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. संस्थेचे संचालक शंकर राऊत, अनिल कराडे, दत्तात्रय खरात, किसन क्षीरसागर, भारती राऊत, नीलिमा क्षीरसागर, शर्मिला क्षीरसागर, श्रीमती पार्वती क्षीरसागर, सिंधू क्षीरसागर, सोमनाथ घनवट, लता चौरे आदी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी संपन्न करण्यासाठी केदार क्षीरसागर व संस्थेचे सन्माननीय सभासद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित जाधव यांनी केले. महादेव(बंडा) क्षीरसागर यांनी उपस्थित सभासद व संस्थेच्या हितचिंतकांचे आभार मानले.

## ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उपायुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत परिडवाल कमलेश यांचे रो हा. क्र-एस-२२३, से-०४, ऐरोली येथील बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती.

## संबोधी प्रबोधन मंच आयोजित महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव संपन्न

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२८, कल्याण (ठाणे) :** संबोधी प्रबोधन मंच यांच्या वतीने आयोजित महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव २०२५ दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी कल्याण पूर्व येथे उत्साहात संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५व्या जयंती, क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९८व्या जयंती आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती निमित्ताने या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ६.३० वाजता बौद्धाचार्य आयु. नामदेव जाधव यांच्या नेतृत्वाखाली बुध्द वंदना व महापुरुषांना अभिवादनाने झाली.




त्यानंतर सायं. ७.०० वाजता बिटस् ऑफ जलसा या विशेष कार्यक्रमात आयु. वैभव आव्रे व आयुनी. सुषमा जाधव यांनी महापुरुषांच्या जीवनगाथेचे प्रभावी सादरीकरण केले.

सायं. ८.०० वाजता आयोजिलेल्या व्याख्यान सत्रात शिवश्री ॲड. रोशन पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य) यांनी तथागत बुध्द आणि महापुरुषांचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्रांती आणि वर्तमान स्थिती या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थित श्रोत्यांना नवे दृष्टीकोन मिळवून दिले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अमितभाऊ सुरेशशेठ सोनवणे, महेशशेठ दशरथ गायकवाड (मा. नगरसेवक), दत्तात्रय शेळके अग्निशमन अधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

संबोधी प्रबोधन मंचचे अध्यक्ष जगदीश एन. गायकवाड, सचिव अर्जुन बी. गायकवाड, कार्याध्यक्ष ॲड. अनिल बनसोडे, सल्लागार गिरीराज एम. गायकवाड, खजिनदार शैलेंद्र खोब्रागडे व सर्व कार्यकारिणी सदस्यांच्या परिश्रमाने कार्यक्रम अतिशय यशस्वी झाला.

कार्यक्रमाचे ठिकाण स्मार्ट पॉईंट जवळ, १०० फुटी रोड, मलंग रोड, कल्याण पूर्व येथे शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत गाजले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल सर्व मान्यवरांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

अक्षराज

# मुंबईकरांचा बेस्टचा प्रवास महागणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२८, मुंबई :** उन्हाळ्याचे तीव्र चटके आणी महागाईने त्रस्त असणाऱ्या तमाम मुंबईकरांना आता आणखी एक झटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.बेस्ट उपक्रमाने सादर केलेल्या भाडेवाढीच्या प्रस्तावाला मुंबई महानगरपालिका प्रशासनाने नुकतीच मंजुरी दिली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका (इचउ) ने बेस्ट (बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट) बस सेवांचे भाडे दुप्पट करण्यास मान्यता दिली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने बेस्ट बसचे भाडे किमान ५ रुपयांवरून कमाल १५ रुपये करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. लवकरच, नॉन-एसी बसचे किमान भाडे १० रुपये आणि एसी बसचे १२ रुपये होईल, जे सध्या ५ रुपये आणि ६ रुपये आहे. प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या मंजुरीनंतर नवीन भाडे लागू होणार आहे. मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.भूषण गगराणी यांनी या निर्णयाची पुष्टी केली आणि माध्यमांना सांगितले की, बेस्टची आर्थिक परिस्थिती खूपच नाजूक बनली असल्याने भाडेवाढ अपरिहार्य होती. गेल्या दशकात



बीएमसीकडून ११,००० कोटींहून अधिक अनुदान घेतलेली बेस्ट सतत तोट्यात होती. बीएमसीने त्यांच्या बजेट मर्यादा सांगितल्यामुळे आणि निधी नाकारल्यामुळे, भाडे वाढवणे हा एकमेव पर्याय होता.

आता ३१ लाखांहून अधिक दैनंदिन प्रवाशांना त्यांचे खिसे आणखी मोकळे करावे लागतील. नवीन भाडे रचनेनुसार, नॉन-एसी बसेसमध्ये ५ किमी अंतरासाठी १० रुपये द्यावे लागतील, जे पूर्वी ५ रुपये होते. त्याचप्रमाणे, ५-१० किमीसाठी १५ रुपये, १०-१५ किमीसाठी २० रुपये, १५-२० किमीसाठी ३० रुपये आणि २०-२५ किमीसाठी ३५ रुपये द्यावे लागतील. प्रत्येक श्रेणीमध्ये एसी बसेसचे भाडे जवळजवळ दुप्पट झाले आहे. मासिक आणि साप्ताहिक पासचे दरही मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आले आहेत. ५ किमीचा नॉन-एसी मासिक पास आता ४५० वरून ८०० वरून वाढेल, तर एसी पास ६०० वरून १,१०० वरून वाढेल. २० किमी नॉन-एसी मासिक पासची किंमत २,६०० असेल आणि एसी पासची किंमत प्रवाशांना ३,५०० असेल.

दरम्यान या निर्णयाविरुद्ध शहरात संताप व्यक्त होत आहे. प्रवासी संघटना आणि नागरिक गटांनी भाडेवाढीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. सरकारला ती टप्प्याटप्प्याने लागू करण्याची किंवा त्यावर पुनर्विचार करण्याची विनंती केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की वाढलेल्या दरांचा कमी उत्पन्न गटांना मोठा फटका बसेल आणि लोक मोठ्या संख्येने उपनगरीय गाड्या किंवा खाजगी वाहनांकडे वळतील. ज्यामुळे वाहतूक आणि प्रदूषणाच्या समस्या वाढतील. दरम्यान, अधिकाऱ्यांचा असा दावा आहे की, मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यासाठी आणि बेस्टला स्वावलंबी बनवण्यासाठी हा निर्णय आवश्यक आहे.

मुंबईकर ते कसे घेतात हे पाहणे देखील महत्त्वाचे असेल.

# थोडक्यात

## ठाणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये जनजागृती व शपथविधी कार्यक्रम

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२८, ठाणे :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५च्या दशकपूर्तीच्या अनुषंगाने सोमवार, दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील विविध कार्यालयांमध्ये विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या दिवशी नागरिकांच्या व्यापक सहभागासह अधिनियमाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले.



कार्यक्रमात आपले सरकार पोर्टल व विविध ऑनलाईन सेवा सुविधा यासंदर्भात माहिती देण्यात आली आणि नागरिकांना या सेवांचा प्रभावी वापर कसा करावा. याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य भाग म्हणून सर्व उपस्थित अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी प्रामाणिक सेवा व पारदर्शक प्रशासनाची शपथ घेतली. नागरिकांनाही त्यांच्या अधिकारांबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ पोलीस अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात लोकसेवेतील पारदर्शकता, गतीशीलता व उत्तरदायित्व यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

# उन्हाळ्यात ऊसाच्या रसाला नागरिकांची पसंती, रसवंतीगृहात मोठी गर्दी

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२८, कुंडलवाडी (नांदेड) :** उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे शहाराच्या विविध रस्त्यांवरील रसवंतीगृहे गर्दीने फुलली आहेत. उसाचा ताजा रस प्यायल्याने सगळा ताणतणाव, थकवा दूर होऊन मनात नवचैतन्य संचारते, अशी प्रतिक्रिया ग्राहक देत आहेत. उन्हाचा चटका वाढला तशी रसवंतीतील लगबग वाढली आहे. उष्णता कमी करून थकवा दूर करणारे सर्वांचे आवडते पेय म्हणजे उसाचा रस. शहरात काही दिवसांपासूनच रसवंत्या थाटण्यास सुरुवात झाली आहे. उन्हाचा पारा वाढताच रसवंतीतील गर्दी वाढू लागली आहे. शहरातील विविध भागात रसवंतीची दुकाने थाटलेली आहेत. काही कुटुंब हातगाड्यावर उसाचा रस विकून उदरनिर्वाह करतात. बर्फ टाकलेला उसाचा रस १० रु. ग्लास तर बिना बर्फाचा १५ रु. ग्लास मिळतो. आपल्याकडे उसाच्या रसात लिंबू आणि काळे मीठ टाकून त्याची रंगत वाढवली जाते. हाताने रस काढताना होणारे शारीरिक श्रम वाचवण्यासाठी रसवंतीच्या धर्तीवर हातगाड्यांवरच आकाराने लहान मशीनचा उपयोग होऊ लागला आहे. दिवसाला चार ते पाच लिटर इंधनाचा वापर करून मशीनद्वारे रस काढला जातो. काही रसवंत्या वर्षभर ही चालवल्या जातात. तर उन्हाळ्यात व्यवसाय म्हणून ४ महिन्यांसाठी गुंतवणूक करून रसवंती थाटणार्यांची संख्याही चांगलीच वाढली आहे. यासह अन्य परिसरात रसवंतीच्या दुकानांत गर्दी वाढू लागली आहे. विविध गल्ली परिसरात फिरत्या रसवंतीच्या घुंगरांचा नाद कानी पडायला लागला आहे.देशभरातील तापमानात चांगलीच वाढ



झाली आहे. उन्हाळा वाढला तरी कामानिमित्त सगळ्यांना बाहेर जावेच लागते. अशा वेळी सगळ्यात पहिल्यांदा आरोग्यासाठी गुणकारी असलेल्या ऊसाच्या रसाची आठवण येते. या दिवसामध्ये महागडे पेय पिण्यापेक्षा उसाचा रस पिण्यास जास्त प्राधान्य दिले जाते. कोल्ड्रिंक, आईस्क्रिम हे आरोग्यासाठी हानिकारक ठरतात. उसाचा रस अवघ्या १० ते १५ रुपये किमतीमध्ये मिळत असल्याने या रसाला मोठी मागणी आहे.

## माणूसकी फॉउंडेशन तर्फे महामानवाच्या विचारांचे उत्सव कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**




**दि.२७, ठाणे :** माणूसकी फाउंडेशन आयोजित महापुरुषांचा विचाराचा उत्सव कार्यक्रम दिनांक २७ एवरील २०२५ रोजी सायं. ५ ते ९ वाजेपर्यंत विरार पूर्वेला वसई विरार महानगरपालिका वाचनालय येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज भोईर ह्यांनी केले. कार्यक्रमाची सुरवात साने गुरुजी व महात्मा फुले ह्याच्या गीताने केली. व प्रथम पेहलगाम काश्मीर ये निष्पाप लोकांच्या भ्याड हल्लात मृत्यूमुखी पडलेल्याना २ मिनटं उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. घटनेचा निषेध करण्यात आला. कार्यक्रमास वंचितच्या विरार वसई प्रमुख गीता जाधव, सुभोध मोरे लेखक विचारवंत, प्रमुख वक्त्या जया बनसोडे आंबेडकर विषयक प्रभोधनकर्त्या, ऍड गिरीष दिवाणजी, पांडुरंग साळवी, संतोष आंबेकर ओ.बी.सी नेता, संतोष खरडमोल योग शिक्षक व कवी, रोहिदास समाज नेते सुभाष आंबोकर, प्रकाश गडा, रजनीताई गडा, कार्याध्यक्ष माणूसकी फॉउंडेशन, ऍड.किरण म्हात्रे महिला अध्यक्ष माणूसकी फॉउंडेशन, बिजयं गोडबोले, खजिनदार माणूसकी फॉउंडेशन, राष्ट्रवादी शरद पवार गटातील नेत्या वनिता तोडवळकर, प्रमोद तांबे बोद्धचार्य ऍड.सुरेश केदारे, आदी विशेष व्यक्तींबरोबर बऱ्यापैकी श्रोते उपस्थित होते. कार्यक्रम छान झाला आंबेडकर चळवळी तील फायर ब्रँडब वक्त्या नी उत्कृष्ट मांडणी करून महामानवांचे समता, बंधूता व स्वतंत्रता आणि एकत्र राहण्याच्या विषयक मोलाचे विचार सांगितले. माणूसकी फॉउंडेशनचे अध्यक्ष घनश्याम आंबोकर ह्यांनी सर्व विचारपीठावरील वक्त्यांचे व जमलेल्या श्रोत्यानाचे आभार मानले.

# पिंपळस -विंचूर- येवला कॉँक्रिटीकरण काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना - छगन भुजबळ

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८, विंचूर (नाशिक) :** येवला विंचूर मतदार संघाचे आमदार छगन भुजबळ यांनी नाशिक येथील कार्यालयात आज विविध विकास कामांबाबत आज अधिकाऱ्यांसमवेत आढावा घेतला.

यावेळी पिंपळस ते येवला या ५६० कोटी रुपयांच्या तसेच लासलगाव ते खेडलेझुंगे या १३४ कोटी रुपयांच्या चौपदरी रस्त्याच्या कॉँक्रिटीकरणाच्या सुरू असलेल्या कामासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. पिंपळस ते येवला व लासलगाव ते खेडलेझुंगे रस्त्याच्या कामांना अधिक गती देऊन नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावे. पावसाळ्याच्या आत जास्तीत जास्त काम पूर्ण करण्यात यावे. कामाला अधिक गती देण्यासाठी कामगारांची तसेच मशिनरीची संख्या दुपटीने वाढवून कामास गती देण्यात यावी. तसेच या कामाला गती न मिळाल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी. आगामी कुंभमेळ्याच्या धर्तीवर हे काम



कुठल्याही परिस्थितीत नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावे. अशा सूचना देखील अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या. तसेच पिंपळस ते येवला या रस्त्यावरील १० किलोमीटर रस्त्याचे काम ३० मे पर्यंत पूर्ण करण्यात येईल, खेडले ते लासलगाव रस्त्याचे काम नियोजित वेळेपूर्वी पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी दिली. लासलगाव-खेडलेझुंगे रस्त्याच्या कामाला खेडले परिसरात ज्या प्रमाणात गतीने काम सुरू आहे. त्याच गतीने लासलगाव-विंचूर या बाजूने रस्त्याचे काम सुरू करून अपघाताचे प्रमाण जास्त असल्याने हे काम प्राधान्याने घेऊन सुरू करण्यात यावे. या रस्त्याच्या अंतर्गत असलेल्या पुलांची कामे देखील जलद गतीने पूर्ण करण्यात यावी. रस्त्याचे काम सुरू असताना वाहतूक सुरळीत राहण्यासाठी देखील सुयोग्य नियोजन करण्यात यावे. अशा सूचना यावेळी केल्या. तसेच लासलगाव बाह्यवळण रस्त्याच्या कामाला देखील अधिक गती देऊन पुढील चार महिन्यात हे काम पूर्ण करण्याबाबत प्रयत्न करण्यात यावे. तसेच शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात याव्यात अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उदय पालवे, उपअभियंता अविनाश देवरे, उपअभियंता प्रकाश घोडे, शाखा अभियंता गणेश चौधरी, संकेत चौधरी, रेखा शेळके, मयूर मोहिते, कंत्राटदार अभय चौकसी, अनिल काळे यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

## टिटवाळा येथे नव्याने विकसित करण्यात आलेल्या उद्यानाला भेट

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२८, कल्याण (ठाणे) :** टिटवाळा, नारायण नगर येथे ३५०० चौ.मी क्षेत्रफळावर विकसीत करण्यात आलेल्या उद्यानाची महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पाहणी केली. तेथील सुमारे ३ हजार ५०० झाडांची लागवड केलेले मानवनिर्मित जंगल, लहान मुलांसाठी बसविण्यात आलेली खेळणी आणि जेष्ठ नागरिकांकरिता उपलब्ध केलेली व्यायामाची साधने इ. सुविधांचा आढावा घेतला आढावा. सदर उद्यान लवकरच नागरिकांसाठी खुले होणार आहे. यावेळी मुख्य उद्यान अधिक्षक संजय जाधव उपस्थित होते.



# राष्ट्रीय ओबीसी महासंघाची बैठक पुणे येथे संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, चंद्रपूर :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या कार्यकारणी बैठक पत्रकार भवन पुणे येथे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.बबनराव तायवाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीला महासचिव सचिन राजुरकर, उपाध्यक्ष डॉ.सुधाकर जाधवर, कार्याध्यक्ष प्रा.शेषराव येलेकर, प्रा.शरद वानखेडे, गुणेश्वर आरेकर , प्रकाश भागरथ, सुभाष घाटे, गोव्याचे अध्यक्ष मधु नाईक, किसान महासंघाचे प्रकाश साबळे, कर्मचारी महासंघाचे शाम लेडे, महिला महासंघाच्या अध्यक्षा ज्योतीताई ढोकणे, मध्य प्रदेश महिला महासंघाच्या अध्यक्षा रत्नमाल पिसे मंचावर उपस्थित होते.

ओबीसी महासंघाचे पहिले महाअधिवेशन दिनांक ७ ऑगस्ट २०१६ ला नागपूर येथे संपन्न झाले. या अधिवेशनामुळे महाराष्ट्र शासनाला क्रिमिलेअरची मर्यादा साडेचार लाख रूपयांवरून सहा लाखापर्यंत वाढवून देण्याचा निर्णय घ्यावा लागला होता. महिला महासंघाने २७ नोव्हेंबर २०१६ ला ओबीसी महिला अधिवेशनाचे आयोजन केले होते. तसेच ८ डिसेंबर २०१६ ला नागपूर येथील महाराष्ट्र राज्याच्या हिवाळी अधिवेशनाच्या वेळी एका लाखापेक्षा जास्त ओबीसी लोकांनी मोर्चा काढून विधानसभेवर जबर धडक दिली होती. याचा परिणाम होऊन महाराष्ट्र सरकारला पहिल्यांदाच ओबीसी मंत्रालयाची स्थापना करावी लागली. ७ ऑगस्ट २०१७ रोजी नवी दिल्ली येथील महासंघाच्या दुसऱ्या महाअधिवेशनानंतर क्रिमिलेअरची मर्यादा ही ६ लाखावरून ८ लाख रूपये करण्यात आली. देशातील सर्व ओबीसी समाजातील लोकांच्या एकत्रीकरण व एकजुटीचे हे फलित होते. या सोबतच भारत सरकारने प्रथमच नागपुरात ५०० विद्यार्थ्यांचे वसतिगृह देण्यास मान्यता प्रदान केली आहे. ७ ऑगस्ट २०१८ रोजी मुंबई येथील नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया, वरली परिसर येथे तिसरे महाअधिवेशन घेण्यात आले होते. याचा परिणाम होऊन महाराष्ट्र राज्यात ओबीसी युवक व विद्यार्थ्यांसाठी महाज्योती नावाने विकास महामंडळ नंतर स्थापन करण्यात आले. याद्वारे ओबीसी विद्यार्थ्यांना युपीएससी, एमपीसीसी, पीएचडी., एम. फिल, जेईई/नीट इ. व्यावसायिक वैमानिक, सनदी लेखापाल (सीए) व कंपनी सचिव (सीएस) इत्यादी स्पर्धा परीक्षांच्या तयारी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा व आर्थिक सहाय्य पुरविण्यात येत आहे. तसेच ओबीसी युवकांना रोजगारांच्या विविध संधी उपलब्ध होण्यासाठी मार्गदर्शन व आवश्यक आर्थिक सहाय्य पुरविण्यात येत आहे. जिल्हा आणि तालुका पातळीवर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

ओबीसी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ही ६ लाख रूपयाहून ८ लाख रूपये करण्यात आली आहे. राष्ट्रीय ओबीसी आयोगाला संवैधानिक दर्जा देण्यात आला आहे. शालेय विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. अशा अनेक मागण्या या आंदोलनामुळे मान्य झाल्या आहेत. ७ ऑगस्ट २०१९ रोजी हैद्राबाद येथे महासंघाचे चौथे महाअधिवेशन घेण्यात आले होते.

या अधिवेशनाचा ही परिणाम विविध राज्य आणि केंद्र सरकारवर पडून ओबीसी लोकांच्या समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन सरकार तर्फे देण्यात आले. पुढे ५ वे महाअधिवेशन ७ ऑगस्ट २०२० रोजी कोविड-१९ प्रभावामुळे जागतिक पातळीवर ऑनलाईन पध्दतीने अमेरिकेहून घेण्यात आले होते, ज्यात संपूर्ण जग आणि भारतातील ५ कोटी पेक्षा जास्त ओबीसी बांधव सहभागी झाले होते. पुढचे ६ वे अधिवेशन ७ ऑगस्ट २०२१ रोजी कोविडच्या प्रादुर्भावामुळे लंडनहून ऑनलाईन घेण्यात आले होते. या जागतिक पातळीच्या अधिवेशनालाही भारतासह जगातील इतर ओबीसी बांधवांनी भरपूर प्रतिसाद दिला होता. यानंतर ७ वे अधिवेशन दिल्ली येथे संपन्न झाले. ८ वे अधिवेशन तिरूपती आध्रप्रदेश व ९ वे अधिवेशन अमृतसर पंजाब येथे संपन्न झाले. केंद्र आणि विविध राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि त्या सर्व मागण्या पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघ देशपातळीवर आंदोलन चालवित आहे. याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दहावे महाअधिवेशन गोवा येथे ७ ऑगस्ट २०२५ रोजी होत आहे. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्यात यावी.

केंद्रात स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात यावे, क्रिमीलेअर ची मर्यादा वाढविण्यात यावी व राज्याने बिहार राज्यात ज्याप्रमाणे ओबीसी प्रवर्गाची जात निहाय जनगणना करण्याचा निर्णय घेऊन जात निहाय जनगणना करण्यात येत आहे त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यात सुद्धा ओबीसी प्रवर्गाची जात निहाय जनगणना करण्याचा निर्णय घेऊन ओबीसी प्रवर्गाची जातीनिहाय जनगणना करावी. मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये, ओबीसी, विजा, भज व विशेष मागास प्रवर्ग समाजाचा रिक्त पदांचा अनुशेष त्वरित भरण्यात यावे. गुणवंत मुलां-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ५० विद्यार्थ्यांची संख्या वाढवून १०० विद्यार्थी करण्यात यावी. इत्यादी मागण्या मंजूर करून घेण्यासाठी ७ ऑगस्ट २०२५ ला गोवा येथे सपन्न होत आहे. बैठकीला राष्ट्रीय ओबीसी महासंघ व महासंघाशी संलग्नित संघटना राष्ट्रीय ओबीसी युवा महासंघ, राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघ, राष्ट्रीय ओबीसी विद्यार्थी महासंघ, राष्ट्रीय ओबीसी अधिकारी-कर्मचारी महासंघ, राष्ट्रीय ओबीसी महिला अधिकारी-कर्मचारी महासंघ, व राष्ट्रीय ओबीसी वकील महासंघ इत्यादी संघटनांच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होते . संचालन शकील पटेल तर आभार अर्जून दले यांनी केले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा उत्साहात; खिचडी व बुंदी लाडुचे वाटप

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती महोत्सव सोहळा उत्साहात पार पडला. या निमित्त खिचडी व बुंदी लाडुचे वाटप करण्यात आले असून महामानवास अभिवादन करण्यासाठी आमदार श्रिजयाताई चव्हाण यांनी उपस्थिती लावली होती. मुदखेड शहरातील बौद्ध प्रशिक्षण केंद्र भिमनगर नवीआबादी, अशोक नगर, लुंबिनी नगर, रेल्वे कॉलनी, समता नगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव सोहळ्याचे दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. या निमित्त भंतेजी व उपासक यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात येऊन बौद्ध वंदना करण्यात आले. विविध राजकीय पक्ष व संघटनांच्या वतीने महामानवास अभिवादन करण्यात आले. यावेळी भोकर विधानसभेच्या, आमदार श्रीजयाताई चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे, करीम खां, भाजप शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे, जयंती मंडळाचे अध्यक्ष राजू चौदंते, सुर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, ऋषिकेश चौदंते मोहम्मद गौस, युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण, शिवकांत देवके, रत्नाकर तारु वांगिकर, राहूल चौदंते, बुद्धभुषन गंगाधर थोरमोटे, विक्रांत गोद्रे, प्रदिप कांबळे, बंटी देवकांबळे, कपील लोखंडे, अशोक डोंगरे यांची उपस्थिती होती. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त स्वर्गीय निवृती गंगाराम खंलोटे यांच्या स्मरणार्थ एक क्विंटल बुंदिचे लाडू वाटप करण्यात आले.

या सोबतच एक हजार बिसलरी बॉटल्सचे वाटप करण्यात आले. महात्मा फुले चौक मित्र मंडळाच्या वतिने अन्नदान वाटप करण्यात आले. माजी नगरसेवक रावसाहेब चौदंते परिवाराच्या वतीने आयोजित अन्नदान वाटपाच्या कार्यक्रमात आमदार श्रिजयाताई चव्हाण यांनी उपस्थिती लावली या नंतर शहरातील प्रमुख रस्त्यांवरुन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सार्वजनिक जयंती मंडळाने महामानवाचे आदर्श विचार आचरण करण्याची सामूहिक शपथ घेतली.